(6)

1

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये

Rs. 100

रु. 100

ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA

◐ 2022 ◐

38AA 383475

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला आहे त्यांनी त्याच कारणासाठी तो स्टँप ६ महिन्याच्या आत वापर करायचा आहे.

दस्ताचा प्रकार/ अनुच्छेद क्रमांक : प्र. पत्र

दस्त नोंदणी करणार आहेत का :

नोंदणी होणार असल्यास दुय्यम निबंधक कार्यालयाचे नाव :

मिळकतीचे वर्णन :

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व पत्ता : मुख्याध्यापिका पोद्दार इंटरनॅशनल स्कूल, खराळवाडी पिंपरी

दुसऱ्या पक्षकाराचे नांव :

हस्ते असल्यास नांव व पत्ता :

मुद्रांक शुल्क रक्कम : 100/- धनश्री सी कांबळे

मुद्रांक विक्री नोंद वही अनु क्रमांक : 2522 दि. 02/1/2023

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही :

मुद्रांक विक्रेत्याची सही/शिक्का/ परवाना क्रमांक

The Pune Lawyers Consumer's Co-op Society Ltd., Pune-5 LIC No. 2201111

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे

21 DEC 2022

प्रथम मुद्रांक लिपीक कोषागार पुणे

NOTARY ADV. ASHOK DAGDU RUPWATE CHINCHWAD, PUNE REGD. NO. 16279 EXP. DATE 26/01/2025 GOVERNMENT OF INDIA

## प्रतिज्ञापत्र

श्री. डॉ. स्मिता पॅटरसन् मुख्याध्यापक म्हणून पोदार इंटरनॅशनल स्कूल या शाळे (UDISE 27251901407 शाळेचा पूर्ण पत्ता- नेहरू नगर रोड, खराळवाडी पिंपरी पुणे - याठिकाणी कार्यरत असून सत्यकथन करतो को मो मा.शिक्षणाधिकारी (प्राथ.) पुणे जिल्हा परिषद, पुणे या कार्यालयाकडे स्व मान्यता (नमुना 2 आदेश) 01/04/22 पासून 31/03/25 पर्यंत मिळणेसाठी प्रस्ताव दाखल केले आहे.

त्यासाठी खालील हमी स्वीकारत असून सत्य प्रतिशेवर कथन करतो.

1) सदर प्रस्तावसोबत जोडलेले सर्व कागदपत्रे हे वैध मार्गाने मिळवलेले आहेत व सर्व कागदपत्रे सत्य आहेत याची मी हमी देतो.

2) सदर शाळा व संस्था हि कोणतीही अनधिकृत शाळा अथवा वर्ग चालवीत नाही.

3) सदर शाळा व संस्था हि सर्व शासकीय नियमाचे पालन हे जबाबदारीपूर्वक करीत आहे.

4) सदर शाळा हि अशी कोणतीही अनुचित कृती करत नाही की, ज्यामुळे शाळेबद्दल पालक, विद्यार्थी अन्य तत्सम व्यक्ती कडून कोणत्याही प्रकारच्या तक्रारी उद्भवतील.

5) शाळेत आवश्यक अभिलेखे रजिस्टर ठेवले असून ते विहित नमुन्यात आहेत व अद्ययावत आहेत. तपासणी अधिकारी यांना तपासणी साठी उपलब्ध आहेत.

6) शाळा परवानगी दिलेल्या ठिकाणीच भरत आहे.

7) शाळा मान्यता अथवा संस्था व्यवस्थापन यांचे संदर्भात न्यायप्रविष्ट बाब नाही याचीही मी हमी देत आहे. भविष्यात या संदर्भात विसंगती अथवा चुकीची व खोटी कागदपत्रे दिल्याचे निदर्शनास आल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी मुख्याध्यापक म्हणून माझी व संस्थेची राहील याची मला जाणीव आहे व होणाऱ्या कायदेशीर परिणामास मी जबाबदार राहीन.

स्थळ- पिंपरी, पुणे

दिनांक- ०२/०१/२०२३

स्वाक्षरी- Smita

नाव:- Dr. Smita Patterson

शिक्का: DR. SMITA PATTERSON
Principal

मो.न:- 7208963534

NOTED & REGISTERED
AT SR NO.: 112
DATE : 02/01/2023

NOTARY ★ ADV. ASHOK DAGDU RUPWATE CHINCHWAD, PUNE REGD. NO. 16279 EXP. DATE 26/01/2026 ★ GOVERNMENT OF INDIA

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

BEFORE ME
Rupwate
ADV. ASHOK DAGDU RUPWATE
NOTARY
GOVERNMENT OF INDIA
REGD. NO. 16279
CHINCHWAD, PUNE

02 JAN 2023

नमुना २

कायम विनाअनुदानीत तत्वावर
( मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू,तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/१८२/२०१६
पुणे १ दिनांक - १६/२/२०१६

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
पोदार एज्युकेशन ट्रस्ट संचलित पोदार इंटरनॅशनल स्कुल, पिंपरी, पुणे

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,२००९ यांच्या कलम १८ च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,२०११ याचा नियम ११, पोट नियम (४) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे.

मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे** दिनांक १ एप्रिल २०१३ यासून दिनांक ३१ मार्च **२०१६** पर्यंतच्या कालावधीसाठी **इयत्ता १ ली ते ८ वी** करिता **पोदार एज्युकेशन ट्रस्ट संचलित पोदार इंटरनॅशनल स्कुल, पिंपरी, पुणे.** यांना तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन** आहे. :-

मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

१. बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम २००९(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम २०११ (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.
२. शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान २५% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.
३. परिच्छेद ३ मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम १२(२) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅक खाते देण्यात येईल.
४. संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.
५. कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.
६. **(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**(दोन)**कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)**कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)**प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम २३ अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)**विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम २३(१) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता ५ वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

2022

# नमुना 2

कायम विना अनुदानित तत्वावर
(मराठी, इंग्रजी, हिंदी, उर्दू,तामिळ इत्यादी माध्यम)

पुणे जिल्हा परिषद, पुणे
यशवंतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खाप्राशा/1362/2019
पुणे 1 दिनांक - 31/10/2019

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
पोदार एज्युकेशन ट्रस्ट मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, आनंदीबाग, लॉन खराळवाडी, पिंपरी,पुणे

**विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वये शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.**

आपल्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर यासंदर्भात शाळांशी केलेला पत्रव्यवहार / शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी **शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**, पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक 1 एप्रिल 2019 पासून ते दिनांक 31 मार्च 2022 पर्यंतच्या कालावधीसाठी इ.1 ली ते इ.8 वी साठी पोदार एज्युकेशन ट्रस्ट मुंबई संचलित पोदार इंटरनॅशनल स्कूल, आनंदीबाग, लॉन खराळवाडी, पिंपरी,पुणे
तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तींच्या पूर्ततेच्या अधीन आहे.**

मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणतेही बंधन नसेल.

1.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम 2011 (जोडपत्र दोन) शाळा पालन करील.

2.शाळांना नजिकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना पहिल्या इयत्तेत त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणे अनुपालन करण्यात येईल.

3.परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल. अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंक खाते देण्यात येईल

4संस्था/शाळा कोणतेही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्यांच्या किंवा त्याच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

5.कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी, धर्म,जात,किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

**6(एक)** शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

**7(दोन)कोणत्याही** बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

**(तीन)कोणत्याही** बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

**(चार)प्राथमिक** शिक्षण पूर्ण केलेल्या बालकास नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

**(पाच)विकलांग** / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांचा अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

**(सहा)** अधिनियमाच्या कलम 23(1) मध्ये अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांच्या नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षांच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

**(सात)** अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्यांची / तिची कर्तव्य शिक्षक पार पाडतील आणि **(आठ)** शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वतःला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करेल

शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहीत केल्याप्रमानेन शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्येविनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ : 8093 **चौ.मी**
- एकुण बांधकामाचे क्षेत्र. 4046 **चौ.मी**
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- 4046 **स्के.मी**
- वर्ग खोल्यांची संख्या. :- 41
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- 2
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृह आहेत काय ? :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| **संडास** | 28 | 28 |
| **मुताऱ्या** | 28 | 28 |

पिण्याच्या पाण्याची सुविधा : **आहे.**

- दुपारचे जेवण शिजवण्यासाठी स्वयंपाकघर. :- **लागू नाही.**
- अध्यापन अध्ययन साहित्य /खेळ व क्रिडाविषयक सामग्री / ग्रंथालय यांची उपलब्धता.:-आहे
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध.:-आहे.( **ग्रंथालय पुस्तक संख्या**-6000 **नियतकालिक/वर्तमानपत्र**: 3)

मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र चालविता येणार नाहीत.

8.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

9.शाळा सोसायटी नोंदणी नियम 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम 1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

10.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

11.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडुन लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

12.तुमच्या शाळेला मिळालेला मान्यता सांकेतांक **प्राथ./का.विअ.शाळा/पिं.चि.मनपा/ /** असा आहे तसेच आपल्या शाळेचा **U-DISE No.**27251901407 हा आहे. या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना कृपया तो नमुद करावा याची नोंद घ्यावी.

13.मा. शिक्षण संचालक / जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकारण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

14.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चित करावी.

15.जोडपत्र तीन नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.